वाचले:

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम दुसरी सुधारणा २०११ नुसार कलम ५३ (३)
२. आस्थापनेवरील रिक्त पदे नामनिर्देशनाव्दारे भरण्याबाबत-जाहिरात क्र.१८४/२०२२
३. कर्मचारी निवड समिती सभा दि.०१/०२/२०२४ रोजीचा सभावृत्तांत
४. उमेदवारांचे पोलीस खात्याकडून प्राप्त झालेले अनुकूल पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल
५. उमेदवारांकडून प्राप्त झालेली जात प्रमाणपत्रे.
६. उमेदवारांचे वैद्यकीय तपासणीबाबत वैद्यकीय अधिक्षक, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, पिंपरी यांचेकडील प्राप्त वैद्यकीय प्रमाणपत्रे
७. मा.आयुक्त यांचेकडील दि.१०/०६/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/४/कावि/९२३/२०२४
दिनांक: १०/०६/२०२४

**विषय : लिपिक (गट-क) संवर्गामध्ये सरळसेवा प्रवेश/नामनिर्देशनाने नियुक्ती देणेबाबत...**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर लिपिक या पदांकरीता ऑनलाईन परिक्षा आयोजित करण्यात आली होती. सदर परीक्षेच्या आधारे खालील गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड दि. ०१/०२/२०२४ रोजीच्या कर्मचारी निवड समितीने केलेली आहे. नियुक्ती पुर्वी या उमेदवारांचा पुर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी व शारिरीक पात्रता तपासणी अहवाल अनूकूल प्राप्त झालेला आहे. सबब, खालील उमेदवारांना लिपिक (गट-क) संवर्गामध्ये सुधारित वेतन संरचना पे लेवल एस-६ र.रु १९९००-६३२०० ह्या वेतनश्रेणीत त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या स्तंभ क्र. ४ मध्ये नमूद प्रवर्गामधून नामनिर्देशनाव्दारे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्यात येत आहे.

| अक्र. | उमेदवाराचे नाव | मुळ जात प्रवर्ग | निवड समितीने केलेल्या शिफारशीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सचिन नवनाथ बागलाणे | ईडब्ल्यूएस | खुला सर्वसाधारण |
| २ | प्रकाश चंद्रकांत क्षीरसागर | खुला (माजी सैनिक) | खुला (माजी सैनिक) |
| ३ | गुणवंत राजकुमार काळवणे | खुला (माजी सैनिक) | खुला (माजी सैनिक) |
| ४ | अंकिता धनेश कोते | इमाव (महिला) | इमाव (महिला) |
| ५ | संकेत विजयकुमार पेटकर | ईडब्ल्यूएस (खेळाडू) | खुला (खेळाडू) |
| ६ | मोईन रियासत शेख | खुला (अंशकालीन) | खुला (अंशकालीन) |

**अटी व शर्ती :-**

१. उमेदवार महापालिका कामकाज करण्यास सक्षम आहे किंवा कसे त्याप्रमाणे त्यांना सोपविण्यात आलेल्या कामकाजाकडे त्यांचा पाहण्याचा दृष्टीकोन, स्वाभाविक कल, कामाबाबतचे कौशल्य किंवा नैसर्गिक क्षमता आणि कामाच्या अनुषंगाने सचोटी व चारित्र्य योग्य आहे किंवा कसे? तसेच सेवाप्रवेशोत्तर/विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे, शासकीय पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-यांचे ज्ञान संपादीत करण्यासाठी देण्यात येणारे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे, कार्यमुल्यमापन अहवालांचे सरासरी संख्यात्मक गुणांची प्रतवारी या बाबी तपासण्याच्या उद्देशाने उपरोक्त उमेदवारांचा परिवीक्षा कालावधी २ वर्षाचा राहील.

२. उपरोक्त उमेदवारांचा परिविक्षाधीन कालावधी जरी २ वर्षाचा असला तरी जोपर्यंत त्यांची नियुक्ती नियमित केली जाणार नाही तोपर्यंत त्यांची नियुक्ती ही परिविक्षाधीनच राहील. तसेच परिविक्षाधीन कालावधी वाढविला गेल्यास , त्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.३९ नुसार कार्यवाही करणेत येईल.

३. नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक अर्हता/परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

४. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मभाप १०८७/१४/सीआर-२/८७/२०, दि. ३० डिसेंबर, १९८७ मधील तरतुदीनुसार एतदर्थ मंडळाची मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिंभाप-१०८३/प्र.क्र. १४४८/वीस, दि. १ डिसेंबर, १९८४ मधील तरतूदीनुसार एतदर्थ मंडळाची हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

तथापि हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या उपरोक्त नियमानुसार जर उमेदवार अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाला नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळाली नसेल तर ती अर्हता/परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. उमेदवारांना महानगरपालिका सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी महानगरपालिकेला किमान १ (एक) महिन्याची आगाऊ लेखी सूचना किंवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक राहील. यासंदर्भातील राजीनामा स्विकारण्याचे अधिकार केवळ नियुक्ती प्राधिकारी यांना असतील. तथापि, राजीनामा दिल्यानंतर पुन्हा राजीनामा मागे घ्यावयाचा असल्यास, त्यांना वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : अंनियो २०१९/प्र.क्र.४७०/सेवा-४, दिनांक ०९/०५/२०२२ मधील तरतूदी लागू राहतील.

मात्र, गैरवर्तणूक, सेवानियमांचा भंग इत्यादी कारणांसाठी उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी सूचना देण्याचे बंधन महापालिकेवर राहणार नाही.

६. परिवीक्षा कालावधीमध्ये प्रशिक्षण / विभागीय/व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण न केल्यास किंवा त्यांचे कामकाज योग्य अथवा अनुरुप न आढळल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियमांचा भंग केल्यास त्यांची महानगरपालिकेतील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

७. उमेदवारांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : परिवि-२७१५/प्र.क्र.३०२/८, दिनांक २२/०६/२०२१ मध्ये नमुद केल्यानुसार परिवीक्षाधीन कालावधीत रजेच्या तरतूदी लागू होतील.

८. माजी सैनिक प्रवर्गामधून पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र. १८०/२८, दिनांक १३ जून, २०१९ नुसार विहित टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय राहिल. याकालावधीत माजी सैनिक आरक्षणाचा दावा करणा-या पात्र उमेदवारांनी विहीत टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. मुदतीत विहीत टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र सादर न केलेस महानगरपालिका सेवेतून कमी केले जाईल.

९. प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११४/प्र.क्र. २००/१६-अ, दिनांक ०४ सप्टेंबर, २०१५ नुसार विहित टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी अनुज्ञेय राहिल. याकालावधीत प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील आरक्षणाचा दावा करणा-या पात्र उमेदवारांनी विहीत टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. मुदतीत विहीत टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र सादर न केलेस महानगरपालिका सेवेतून कमी केले जाईल.

१०. मागसवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार जात वैधता प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे. सदरहू उमेदवाराकडे जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेतलेले जाती वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याने नियुक्तीसाठी हजर होताना ते सादर करावे. नसल्यास त्याने जाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे नियुक्ती प्राधिका-यांमार्फत जात पडताळणी समितीकडे तात्काळ सादर करावीत. ६ (सहा) महिन्याच्या मुदतीत जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याकालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकल्यास सदर उमेदवाराची पूर्वसूचना न देता सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

११. प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी, खेळाडू व अनाथ या सर्व घटकातील पात्र असलेल्या उमेदवारांना कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार लिपिक या पदावर देण्यात येणारी नियुक्ती ही वरील सर्व घटकातील पात्र उमेदवारांच्या मुळ वर्गवारीची त्यांच्या प्रवर्गातील समांतर आरक्षणासाठीच्या प्रमाणपत्रांची वैधता तपासणी करुन घेण्याच्या अधीन राहील. समांतर आरक्षणासाठीच्या प्रमाणपत्र अवैध ठरल्यास उमेदवारांना तात्काळ सेवेतून कमी करण्यात येईल.

१२. लिपिक पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणा-या उमेदवाराकडे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९.३.२००३ मधील तरतुदीनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४.०२.२०१३ व शासन पूरकपत्र क्र. मातंसं २०१२/प्र.क्र.२७०/३९, दिनांक ०८.०१.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार संगणक अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तथापि, नियुक्ती स्विकारण्याच्या वेळेस सदर प्रमाणपत्र/अर्हता उमेदवारांकडे नसल्यास नियुक्ती स्विकारल्यापासून दोन वर्षाच्या आत उमेदवाराने उपरोक्त शासन निर्णयातील नमूद संस्थेचे संगणक ज्ञानाच्या अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. या विहित कालावधीत उमेदवाराने सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास सा.प्र.वि अधिसूचना क्रमांक एसआरव्ही - २०१७/प्र.क्र.४६२/का-१२ दि.२८.०५.२०१८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३. उपरोक्त उमेदवारांना लिपिक (गट-क) या संवार्गमध्ये देण्यात येणारी नियुक्ती ही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेकडून उमेदवाराने धारण केलेल्या मराठी व इंग्रजी टंकलेखन अर्हतेच्या प्रमाणपत्रांची वैधता तपासणी करुन घेण्याच्या अधीन राहील. टंकलेखन प्रमाणपत्र अवैध ठरल्यास उमेदवारांना तात्काळ सेवेतून कमी करण्यात येईल.

१४. उमेदवारांनी परिक्षा अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता नियुक्तीपुर्वी महापालिकास्तरावर उमेदवाराने सादर केलेल्या शैक्षणिक अथवा तत्सम प्रमाणपत्रांच्या छायांकित सत्यप्रती तपासण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये व मूळ दाखल्यात तफावत आढळल्यास, माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास महापालिका स्तरावरुन दावे तपासताना किंवा अन्य कारणामुळे मुळ नियुक्तीसाठी अपात्र ठरणा-या संबंधीत उमेदवारांची उमेदवारी/ शिफारस नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व ते फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरतील.

१५. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने स्वीकारलेले सेवानियम अथवा सेवानियमाबाबत केलेले उपविधी किंवा सध्या अस्तित्वात असलेले सेवानियम व भविष्यकाळात अंमलात येणारे सेवानियम आपल्यावर बंधनकारक राहतील.

१६. महापालिकेच्या कामकाजाच्या सोयीनुसार काम करावे लागेल व कामाच्या वेळेनुसार शिफ्ट ड्यूटीमध्ये (पाळीपध्दत) काम करावे लागेल व प्रशासकीय कारणास्तव दिलेल्या बदलीच्या ठिकाणी काम करावे लागेल. तसेच तातडीच्या कामकाजाकरीता नेमून दिलेल्या कामकाज वेळेव्यतिरिक्त व्यवस्थापनाने बोलविल्यास कामावर हजर रहावे लागेल व तो कामकाजाचा भाग राहील.

१७. 'महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१' नियम (२) (ब) नुसार उपरोक्त उमेदवारांनी प्रस्तुत नेमणूकीचे आदेश निघाल्याच्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसांच्या आत नेमणुकीचा स्विकार केल्यास आपापसातील ज्येष्ठतेचा क्रमांक निवड समितीने केलेल्या मूळ शिफारस यादीतील क्रमानुसार (अनुक्रमांकानुसार/गुणानुक्रमानुसार) निर्धारित केली जाईल.

उमेदवार विहीत मुदतीत हजर न झाल्यास सेवाजेष्ठता निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ मधील तरतुदीनुसार केली जाईल. नियुक्ती आदेशाचा दिनांक जरी वेगवेगळा असला तरी, विहीत मुदतीत रुजू झाल्यास गुणानुक्रमानुसार सेवाजेष्ठता निश्चित केली जाईल याची नोंद घ्यावी.

१८. उमेदवारास नियुक्ती स्विकारण्यासाठी उपस्थित रहाण्याकरीता प्रवासभत्ता किंवा कुठलाही भत्ता देण्यात येणार नाही.

१९. महापालिकेच्या सेवेत रुजू झाल्यानंतर प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यापारात किंवा धंद्यात गुंतणार नाही किंवा दुसरी कोणतीही नोकरी स्वीकारणार नाही.

२०. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक ०१.०७.२००५ अन्वये दोन पेक्षा अधिक अपत्य असणा-या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंब प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नियुक्त्यासाठी अधिसूचनेत विहित केलेली लहान कुटूंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे. त्याअनुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना 'अ' नुसार उमेदवाराने सादर करावे. सदर नियमानुसार दिनांक २८/०५/२००५ नंतर तिसरे अपत्य असणा-या उमेदवारची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२१. उमेदवार सध्या केंद्र/राज्य शासनाच्या सेवेत अथवा निमशासकीय सेवेत कार्यरत असतील तर संबंधित नियंत्रक अधिका-यांनी त्यांना नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्याच्या दृष्टीने सदर सेवेतून कार्यमुक्त झाल्याचे अथवा तसे राजीनामापत्र/लेखी पत्र सादर केल्याशिवाय त्यांना रुजू करुन घेता येणार नाही. त्याचप्रमाणे याबाबत विहित नमुन्यात र.रु.५००/- चे स्टॅम्पपेपरवर नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

२२. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : अंनियो/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ मधील तरतूदीनुसार उपरोक्त उमेदवारांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तिवेतन योजना (महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरणार नाही. तसेच निवृत्ती वेतन योजनेबाबत शासनस्तरावरुन जो काही निर्णय प्राप्त होईल व त्या अनुषंगाने महापालिकेमार्फत स्विकाराह्य धोरण संबधित उमेदवारांवर बंधनकारक असेल.

२३. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेत हजर होताना सेवायोजन कार्यालयाकडील मूळ नोंदणी प्रमाणपत्र घेऊन यावे. सदरचे नोंदणी प्रमाणपत्र महानगरपालिका कार्यालयात जमा करुन घेतले जाईल.

२४. उमेदवाराने नियुक्ती स्विकारण्यासाठी उपस्थित राहताना पुढील प्रमाणपत्रांच्या मुळ प्रमाणपत्रांसह साक्षांकित छायांकित २ प्रती सोबत आणाव्यात. मूळ दाखले सोबत न आणलेस रुजू करुन घेतले जाणार नाही.

१. महानगरपालिका सेवेत हजर होताना नव्याने काढलेल्या आपल्या छायाचित्राच्या (फोटोच्या) शासकीय अधिका-याने/नोटरी यांनी प्रमाणित केलेल्या दोन प्रती सादर कराव्यात.
२. जन्मनोंद दाखला
३. शाळा सोडल्याचा दाखला ( दाखल्यावर जात व जन्मदिनांकाची नोंद अत्यावश्यक राहील)
४. अधिवास प्रमाणपत्र
५. धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र
६. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग, अमागास (महिला) या वर्गवारीत शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची सक्षम प्राधिका-यांनी प्रमाणित केलेलेली उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे विहित नमुन्यातील (NCL) प्रमाणपत्र (दि.३१.०३.२०२३ या वित्तीय वर्षा अखेर पर्यंतचे)
७. महिलांच्या आरक्षित पदावर शिफारस करण्यात आलेल्या महिला उमेदवारांनी महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि. १५.१२.२०१७ व ३१.०१.२०२० मधील तरतुदी नुसार शासनाने प्रस्तावित केलेले उन्नत व प्रगत गटात (क्रिमिलेयर) मोडत नसल्याचे दि.३१.०३.२०२३ या वित्तीय वर्षा अखेर पर्यंतचे प्रमाणपत्र.
८. मागासवर्गीय असल्यास जाती/जमातीचे मुळ प्रमाणपत्र तसेच संबंधित विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी दिलेले जात वैधता प्रमाणपत्र
९. महिला/माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/अनाथ/खेळाडू/ शारीरिक अपंगत्व असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेले मूळ प्रमाणपत्र
१०. लिपिक पदासाठी मराठी टंकलेखनाचे ३० शब्द प्रति मिनिट गतीचे व इंग्रजी टंकलेखनाचे ४० शब्द प्रति मिनिट गतीचे शासकीय परिक्षा मंडळाचे प्रमाणपत्र.

२५. शासन परिपत्रक क्र.सीडीआर-१०१०/प्र.क्र.५५४/पुनर्बांधणी ७०/११, दि.११ नोव्हेंबर २०१४ नुसार भारतीय संविधानाशी एकनिष्ठ बाळगण्याची शपथ घ्यावी लागेल.

सही/-
(शेंखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.

प्रति,
श्री./श्रीम.-----------------------------------

प्रत:- १. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३.प्रशासन टेबल क्र. ७,१०,१२,१४
४. प्रशासन विभाग-संगणक कक्ष ५. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ.
६. पिं.चिं.मनपा सेवकाची सहकारी पतसंस्था ७. संबंधित विभाग

उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.